# -: सूचना :-

दिनांक ११.६.२०२० रोजी विविध पदाकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यामधील पद क्रमांक ३, ९, १० व ११ करिता अर्ज हे महानगरपालिकेची वेबसाईट वर दिनांक १६/०६/२०२० पर्यंत दाखल करावेत असे कळविण्यात आलेले आहे.

परंतू तांत्रिक अडचणीमुळे पद क्रमांक ३, ९, १० व ११ करिता अर्ज हे स्वतः किंवा पोस्टाने (By Speed Post) खालील पत्यावर पाठवावे. कृपया सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

पत्ता :- मनपा डाटा सेंटर, सिटी मार्व्हल बिल्डींग, पहिला मजला,
सरस्वती भुवन कॉलेज शेजारी, सिटी बँकेच्या समोर,
औरंगपूरा, औरंगाबाद
दुरध्वनी क्र.०२४०-२३४३८८६ व २३५६७७३

आदेशावरुन

# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

कार्यालयीन उपयोगाकरिता
१. पदाचे नांव :-
२. जात व प्रवर्ग :-
३. पात्र / अपात्र :- ---------------
४. अपात्र असल्याचे कारण :-----------------
-------------------------------------
स्वाक्षरी
नांव :- ------------------------------

### अर्जाचा नमूना

नोंदणी क्रमांक :-

फोटो

पदाचे नांव :--------------------- जात व प्रवर्ग:- ------------------------------

१. उमेदवाराचे नांव :- --------------------------------------------------

२. पत्ता :- --------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

३. फोन/मोबाईल :- --------------------------------------------------

४. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्रं. | शैक्षणिक अर्हता | संस्था | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

५. Reg. No : -------------------------- २. रजिस्ट्रेशची अंतिम मुदत :- ---------------

६. अनुभव :

| अ.क्रं. | संस्था | पदनाम | एकूण कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७. संगणक :- --------------------------------------------------

८. इतर :--------------------------------------------------

९. जात वैधता प्रमाणपत्र :- आहे / नाही / लागू नाही

दिनांक :-

स्वाक्षरी

पाठविण्यात यावे.

## मुलाखतीच्या सूचना

१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणारी सर्व अधिकारी/कर्मचारी यांची निवड थेट मुलाखत पध्दतीने करण्यात यावी.

२) छाननीअंती पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात यावा.

३) मुलाखतीसाठी आवश्यकतेनुसार योग्य बंदोबस्त ठेवण्याची दक्षता घ्यावी.

४) मुलाखतीसाठी एकास पाच याप्रमाणे उमेदवारांना बोलावण्यात यावे.

५) जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार याप्रमाणे पदानुसार पदवी/पदविका/GNM/ANM Course/Pharmacist/Lab Technician इत्यादी या शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावावा.

६) एकूण १०० गुणांची मुलाखत असावी.

७) यामध्ये पदवी/पदविका/GNM/ANM Course/ Pharmacist/Lab Technician च्या शेवटच्या वर्षाच्या गुणांनुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात यावे. गुण तक्ता पुढीलप्रमाणे असावा.

| National Urban Health Mission | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Name of the Post :- ------------------ | | | | | | |
| Oate of Interview :-00/00/2014 Interview Time : ......:00 A.M. | | | | | | |
| Sr.No. | Name of the Candidate | Educational Qualification (Final year Marks) | Additional Qualification | Experience | Subject Knuwledge (Oral) | Total Marks |
| | | 80 Marks | 5 Marks | 5 Marks | 10 Marks | 100 Marks |
| 1 | -------------------- | ------------ | ------------ | ---------- | ------------ | ------------ |

८) पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त १ गुण, पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त २ गुण देण्यात यावे.

९) ५ गुण अनुभवास आधारीत असावे दोन वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ३ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरावा.

१०) १० गुण विषय ज्ञानासाठी देण्यात यावे. प्रत्येक उमेदवाराची मुलाखत झाल्यानंतर निवड समितीच्या सदस्यांनी विचारविनिमय करून उमेदवाराच्या गुणवत्तेनुसार १० पैकी गुण एकमताने गुणपत्रिकेवर नमूद करावे निवड समितीतील कोणत्याही सदस्याने त्या उमेदवारास स्वतंत्रपणे वेगवेगळे गुण देऊ नयेत.

४. संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक.............................................. सदस्य

५. मुख्याधिकारी, नगरपालिका........................................................ सदस्य सचिव

- कटकमंडळे -

१. संबंधित कटकमंडळाचे मुख्याधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी... अध्यक्ष

२. संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ यांचा प्रतिनिधी.......... सदस्य

३. संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी ...................... सदस्य

४. संबंधित क्षेत्राचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी ............................ सदस्य सचिव

५. भरतीबाबत जिल्हयातील सर्वाधिक खप असणा-या दोन राज्यस्तरींय वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात यावी. जाहीरातीचा नमूनासुध्दा सोबत जोडण्यात येत आहे. सदर नमून्यानुसार आपल्या संबंधित असणारा आवश्यक बदल करुन जाहीरात देण्यात यावी.

६. सदर जाहीरात ही महानगरपालिका/नगरपालिका/कटकमंडळे/सिडको यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावी.

७. भरतीसाठीच्या पदांची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व मासिक एकत्रित मानधन हे सोबत जोडण्यात आले आहे (TOR) त्यानुसार जाहीरात देण्यात यावी.

८. अर्ज स्वीकारणी व नोंदणी ही मुलाखतीच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता सुरु करावी. अर्ज स्वीकारणी व नोंदणीचा कालावधी हा सकाळी ९.०० ते १०.०० असा ठेवण्यात यावा .परंतु अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम वेळेबाबत स्थानिक परिस्थितीप्रमाणे आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार निवड समितीला असेल व त्याबाबत गरजेनुरुप निर्णय घेण्यात यावा व तसे सूचना फलकावर लावण्यात यावे..

९. अर्जाची नोंदणी केल्यानंतर त्वरीत अर्जाची छाननी करण्यात यावी. स्वीकारलेल्या अर्जाची छाननी पूर्ण होईपर्यंत हे काम सुरु ठेवावे.

१०. अर्जाची छाननी करण्यासाठी जबाबदार कर्मचा-यांची निवड करण्यात यावी.

११. अर्जांच्या छाननीच्या कामावर निरीक्षण व संनियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अधिका-याची नियुक्ती करण्यात यावी.

१२. अर्जाची छाननी ही राज्य आरोग्य सोसायटीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी.

१३. अर्जांच्या छाननीअंती अपात्र ठरणा-या उमेदवारांचे अपात्रतेचे कारण फॉर्मवर व त्याच्या अर्जावर नमूद करावे व अपात्र उमेदवारांना जाण्यास सांगावे.

१४. जे उमेदवार पात्र ठरतील त्यांना मुलाखत क्रमांक देऊन मुलाखत हॉलमध्ये बसण्यासाठी

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० | आरोग्य भवन, ३रा मजला, |
| फॅक्स - ०२२ - २२६४२६५५ | सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, |
| E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा. क्र. राआअमुं/मनुष्यबळ/कोविड-१९ पदभरती/ /२०२०
दिनांक : ८ जून, २०२०

प्रति

१. उपसंचालक, आरोग्य सेवा, (सर्व)
२. जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)

विषय : कोविड-१९ कृति आराखड्यांतर्गत कोविड केअर सेंटर व रुग्णालयांकरीता आवश्यक मनुष्यबळ विशेष पदभरतीद्वारे उपलब्ध करून घेणेबाबत.

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.कोविड कक्ष/नियंत्रण व उपचार/त्रिस्तरीय रचना/ २०२०, दिनांक १३ एप्रिल ,२०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्र.मनुष्यबळ/कोविड-१९ पदभरती/ ४१२५-४२४३/ २०२०, दिनांक ४.०५.२०२०
३. या कार्यालयाचे पत्र क्र.मनुष्यबळ/कोविड-१९ पदभरती/ ११५४४-६८१/ २०२०, दिनांक २१.०५.२०२०

संपुर्ण जगात व त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यात सुरु असलेल्या कोविड-१९ या महामारीने त्रस्त रुग्णांना योग्य उपचार सुविधा देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने त्रीस्तरीय रचना आखली असून त्यामध्ये १) समर्पित कोविड रुग्णालय (DCH) २) समर्पित कोविड आरोग्य केंद्र (DCHC) व ३) कोविड निगा केंद्र (CCC) यांचा समावेश आहे. या केंद्र व रुग्णालयांकरीता लागणारे अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक सुचना व कार्यपद्धती संदर्भ क्रमांक १ ते ३ मध्ये नमुद पत्रान्वये सर्व संबंधितांना देण्यात आल्या होत्या व त्यानुसार सर्व संबंधितांनी आवश्यक पदभरतीची कार्यवाही त्यांच्या स्तरावरून पुर्ण करून पदभरतीस मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव दिलेल्या सुचनांनुसार या कार्यालयास सादर करीत आहेत. रेचसे प्रस्ताव हे उपसंचालक कार्यालयाकडून सर्व जिल्ह्याचे एकत्रित येत नसून आवश्यकतेनुसार जल्हानिहाय सादर करण्यात येत आहेत. यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यास विलंब होत आहे. कोविड-१ ची गंभिरता लक्षात घेता असे प्रस्ताव तातडीने मान्य करून पदभरती विनाविलंब होणे अपेक्षित आहे. करीता ज्या विभागातील ज्या जिल्ह्यांचे कोविड-१९ विशेष पदभरतीचे प्रस्ताव मान्यतेकरीता सादर केले हेत किंवा करण्यात येत आहेत अशा प्रस्तावांना पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत हे.

१. दि.१३.०४.२०२० च्या पत्रात दिलेल्या सुचनांनुसार केंद्रकरीता आवश्यक मनुष्यबळाची परीगणना केलेली असावी व त्यास संबंधित जिल्हाधिकारी यांची मान्यता घेतलेली असावी.
२. उपरोक्त परीगणनेनुसार व दिलेल्या सुचनांनुसार पदभरतीची संपुर्ण प्रक्रिया राबविलेली असावी. सदर प्रक्रियेनुसार तयार केलेल्या गुणवत्ता यादीसही संबंधित जिल्हाधिकारी यांची मान्यता घेतलेली असावी.
३. आवश्यक मनुष्यबळाची नोंद कोविड कृती आराखड्यात नोंद घेतलेली असावी व मानधनाकरीता आवश्यक तरतूद केलेली असावी.

४. नेमण्यात येणारे मनुष्यबळ हे कोविड केअर सेंटर/रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या संख्येच्या प्रमाणात आहे याची खात्री करावी. आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ असल्यास तात्काळ कमी करण्यात यावे किंवा इतर कोविड केअर सेंटरवर आवश्यकतेनुसार वर्ग करावे.

५. कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक मनुष्यबळ नेमण्यात येऊ नये. तसे केल्याचे आढळल्यास संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. याबाबत सद्यस्थितीत लागू असलेल्या केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करावे. तसेच संदर्भ क्र. ३ ते ५ मध्ये दिलेल्या सुचनांचेही पालन करावे.

७. ज्या केंद्रावर रूग्ण दाखल केले आहेत अशा ठिकाणीच मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात यावी. किमान आवश्यक मनुष्यबळाचीच नेमणुक करण्यात यावी.

८. कर्मचा-यांची संख्या रुग्णांच्या संख्येच्या प्रमाणात असावी.

९. आवश्यक मनुष्यबळास केवळ कोविड रुग्णालयांमध्येच नियुक्ती देण्यात यावी. तसेच कोविड १९ कृती आराखड्यामध्ये याची नोंद केलेली असणे आवश्यक आहे.

१०. सदर पदभरती दरम्यान नियुक्ती देण्यात येणा-या कर्मचा-यांस प्रथम तीन महिने किंवा कोविड-१९ साथ असेपर्यंत, जे आधी घडेल ते, या कालावधीकरीताच नियुक्ती देण्यात यावी. त्यापूढे नियुक्ती सुरु ठेवायची असल्यास तसा प्रस्ताव मुंबई कार्यालयास सादर करावा. तसेच नियुक्ती दिलेल्या उमेदवाराचा तीन महिन्याचा कालावधी संपताच त्याची नियुक्ती आपोआप संपुष्टात येइल.

११. जर कोवीडसाठी नेमलेल्या उमेदवारांना तीन महिन्यांच्या पुढे नेमणूक देणे आवश्यक झाल्यास तसा प्रस्ताव संबंधीतांचा नेमणूक कालावधी संपण्यापुर्वी किमान तीन आठवडे अगोदर या कार्यालयास पाठवावा.

सदयस्थितीत उपसंचालक, आरोग्य सेवा स्तरावर भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांनी त्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी उपसंचालक, आरोग्य सेवा यांचेकडे करावी. उपसंचालक यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पात्र उमेदवारांच्या यादीमधून आवश्यक तितक्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांना उपलब्ध करुन द्यावी. संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांनी जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने या उमेदवारांस नियुक्तीपत्र द्यावे. उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालयाकडून आवश्यक तितके उमेदवार उपलब्ध न झाल्यास आणि आवश्यकता असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांनी जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने आवश्यक रिक्त पदे भरण्याकरीता नव्याने पदभरतीची कार्यवाही करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

(डॉ. अनुपकुमार यादव)
आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत महितीस्तव,
१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
४) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई/पुणे
५) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)